# मानवी हक्क विभाग

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाद्वारे आजिवन विस्तार व कार्य विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्यावतीने सहा महिन्यांचा मानवी हक्क प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा कोर्स सुरू करण्यात आला होतो. या कोर्ससाठी महाविद्यालयातील दहा विद्यार्थ्यांनी आपला प्रवेश घेऊन कोर्स यशस्वीरित्या पूर्ण केला. विद्यार्थ्यांना भारतीय राज्यघटना, नागरिकांचे मुलभूत अधिकार, जागतिक पातळीवरील मानवी हक्काची ओळख व माहिती, स्वातंत्र्य, समानता, बंधुता या तत्त्वांची समाजमानसात जगताना ती कशी अवलंबावी या सर्व घटकांची माहिती होण्यासाठी हा कोर्स सुरू करण्यात आला. या विभागाद्वारे संपूर्ण वर्षात पुढील उपक्रम राबविण्यात आले.

१. ३०/०९/२०२३ – मानवी हक्क अभ्यासक्रमाद्वारे हुपरी पोलीस स्टेशन, हुपरी येथे अभ्यास भेट देण्यात आली. यावेळी पोलीस स्टेशनची कार्यपध्दतीची माहिती विद्यार्थ्यांनी घेतली.

२. २६/११/२०२३ – संविधान दिनानिमित्त महाविद्यालयात संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. यावेळी संविधान दिनानिमित्त निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

३. ११/१२/२०२३ – "१० डिसेंबर जागतिक मानवी हक्क" दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रकांचे उद्‌घाटन मा. प्राचार्य व्ही. ए. माने (व्यंकटैश महाविद्यायल, इचलकरंजी) यांच्या हस्ते करण्यात आले.

४. २५/०१/२०२४ – राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. तसेच याविषयास अनुसरून विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रिकेचे अनावरण करण्यात आले. यावेळी 'मतदान : माझी जबाबदारी' या विषयावर मतदान जनजागृतीपर तयार करण्यात आलेल्या पथनाट्याचे सादरीकरण महाविद्यालय, हुपरी व रेंदाळमधील विविध परिसरात करण्यात आले.

५. १८ जानेवारी व १५ फेब्रुवारी २०२४ रोजी हातकणंगले पंचायत समिती यांच्यावतीने विद्यार्थ्यांच्यामध्ये मतदार जनजागृती विषयक उपक्रम घेण्यात आला. यावेळी EVM मशिनद्वारे मतदान कसे करावे याविषयी प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांना दाखविण्यात आली.

६. १५/०३/२०२४ – भारतीय संविधान व मतदान जनजागृती अभियानाअंतर्गत संविधान संवाद समिती कोल्हापूर यांच्यावतीने "संविधान युवा संवाद" या उपक्रमाअंतर्गत मा. शोभा राजवैभव, कोल्हापूर यांनी संवादक म्हणून विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि भारतीय राज्यघटना, प्रास्ताविका याचा अर्थ व महत्त्व स्पष्ट केले.

अशारितीने मानवी हक्क विभागाद्वारे संपूर्ण वर्षभरात विविध उपक्रम राबविण्यात आले.

समन्वयक – प्रा. डॉ. संध्या माने